# प्रेस नोट

दिनांक - १८/१२/२०१९

**पोलीस आयुक्त कार्यालय,**
**पिंपरी चिंचवड.**

**विषय :- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या संकेतस्थळाचे (https://pcpc.gov.in/) लोकार्पण**

* * * *

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या संकेतस्थळाचे लोकार्पण आज दि.१८/१२/२०१९ रोजी मा.पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई (भा.पो.से.) यांचे शुभहस्ते करण्यात आले.

सदरचे संकेतस्थळ **https://pcpc.gov.in/** हे आधुनिक तंत्रज्ञान वापरुन तयार केल्याने ते मोबाईल, टॅब, आयपॅड या उपकरणांमध्येही सहजपणे ओपन केले जाऊ शकते. तसेच त्यामध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आलेला आहे.

संकेतस्थळ इंग्रजी तसेच मराठी भाषेमध्ये तयार करण्यात आले आहे. यामध्ये नागरिकांना ई-तक्रार देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सिटीझन अलर्ट वॉलवर पोलीसांनी दिलेली माहिती नागरिक देखील पाहू शकणार आहेत. संकेतस्थळावर माहितीचा अधिकार, पोलीस भरती विषयक माहिती, पोलीस विभागाचे विविध उपक्रम, सुरक्षेबाबत दक्षता, शहरातील वाहतूक विषयक माहिती इ. नागरिकांसाठी उपलब्ध आहे. नव्या संकेतस्थळावर पिंपरी चिंचवड पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी आणि विविध पोलीस शाखा व पोलीस स्टेशन अधिकारी यांचे संपर्क क्रमांक तसेच नागरिकांना नजिकच्या पोलीस स्टेशनची माहिती तात्काळ उपलब्ध होऊ शकणार आहे. पोलीस नियंत्रण कक्ष येथे मदतीकरिता विविध हेल्प लाईन्सची माहिती देण्यात आली आहे.

अंध व्यक्तींना देखील स्क्रीन रिडर सॉफ्टवेअर च्या सहाय्याने सदरचे संकेतस्थळ वापरणे सुलभ आहे. लॉस्ट अँड फाउंड ( हरविले / सापडले ) ह्या टॅब वरुन नागरिकांना अति महत्वाची वस्तु हरवल्याची व सापडल्याची माहिती पोलीसांना तात्काळ घरबसल्या देता येणार आहे. सदरच्या संकेतस्थळावर नागरिकांना भाडेकरुची माहिती, हरविलेल्या व्यक्तींबाबत माहिती, चोरीस गेलेली व बेवारस वाहने, अनोळखी मृतदेह, पोलीस पडताळणी सेवा इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. विविध प्रकारचे परवाने मिळणेकरिता विहीत नमुन्यातील फॉर्म्स देखील उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

सध्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग असल्याने, तसेच सर्व नागरिक मोबाईल व इंटरनेटचा मोठ्या प्रमाणात वापर करित असल्याने, त्यांना त्याव्दारे पिंपरी चिंचवड पोलीस दलाच्या संकेतस्थळावर आवश्यक अशी सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता विकसित केलेले संकेतस्थळ निश्चितच उपयोगी ठरणार असल्याने, नागरिकांनी पोलीस कामकाजासाठी सदर संकेतस्थळाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याचे आवाहन मा.पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई (भा.पो.से.) यांनी केले आहे.

**( सुधीर हिरेमठ )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पिंपरी चिंचवड

प्रति,
संपादक,
.................................................

कृपया आपले दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.